Vol. 7, Issue 4, January 2018 ISSN 2249-894X

# REVIEW OF RESEARCH

*An International Multidisciplinary Peer Reviewed & Refereed Journal*

**Impact Factor: 5.2331**

**UGC Approved Journal No. 48514**


**Chief Editors**
Dr. Ashok Yakkaldevi
Ecaterina Patrascu
Kamani Perera

**Associate Editors**
Dr. T. Manichander
Sanjeev Kumar Mishra

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

डॉ. भारत एम. राठोड
सहयोगी प्राध्यापक , शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय,
अर्जुनी/ मोरगांव, जि. गोंदिया.



**सारांशः-**
शिक्षा, संघटीत व्हा आणि संघर्ष करा या तत्वात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व शैक्षणिक विचारांचे सार आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार जागतिक किर्तीचे विद्वान, मानव मुक्तीचे प्रणेते, महामानव अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लहानपणा पासून उच्च-निच्चतेचे, अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले. जात, धर्म व आजूबाजूची सामाजिक परिस्थिती याचा अनुभव लहानपणापासून त्यांना आला होता. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता यामुळे समाजाचे खंडात्मक विभाजन झाले. जातीची, धाार्मिक निर्बंधाची पकड एवढी मजबूत होती की माणसाला आपण माणसे आहोत याचाही विसर पडला होता. अशा अंधकारमय परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीकारी विचारांची प्रासांगिकता प्रतिपादीत केली.

## डॉ. आंबेडकरांच्या काळातील शिक्षण व्यवस्था :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या जातीत जन्माला आले होते त्या जातीला व इतर तत्सम जातीला हिंदू धर्मातील शिक्षण व्यवस्थेत शिक्षण घेण्याची संधी नाकारलेली होती. कोणत्याही शुद्राने शिक्षण घेण्याचा प्रयत्न केला तर त्याला भयंकर कठोर शिक्षा होत असे. प्रसंगी मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतुद त्यात होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सुद्धा शिक्षण घेताना भयंकर यातना भोगाव्या लागल्या. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लक्षात आले अडाणी माणूस मनाने गुलाम होतो. त्याचा अशिक्षितपणा त्याला लाचार व स्वत्वहिन बनावते. म्हणून तळागाळातील समाजामधील गुलामगिरी नष्ट करावयाची असेल, त्यांच्यातील न्युनंगड नाहीसा करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणून प्रथम दलित वर्गातील लोकांना शिक्षणाचे प्रवेशद्वार उघडे करून दिले पाहिजे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करतांना भगवान बुद्ध म्हणतात, “स्वयं प्रकाशित व्हा” संत कबीर शिक्षणाचे महत्त्व सांगताना म्हणतात की, “ज्ञानाशिवाय मनुष्य आंधळा आहे” शिक्षणाचे महत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकांना सांगितले आणि शिक्षण घेण्याचा आग्रह समाजातील तळागाळातील लोकांना केला. ज्या समाजाला ज्ञानापासून वंचित ठेवण्यात आले त्या समाजाला डॉ. आंबेडकरांनी “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” असा मौलिक संदेश दिला.

२८ ऑक्टोबर १९५४ रोजी मुंबईमधील भाषणात म्हणाले “माझे पहिले दैवत विद्या होय, विद्येशिवाय मानवाला शांती नाही आणि माणूसकीही नाही विद्या ही सर्वांना अवगत झाली पाहिजे ती महासागरासारखी आहे. ज्याप्रमाणे माणसाला जगायचे असेल तर अन्नाची आवश्यकता आहे. तशीच विद्येचीही आवश्यकता आहे. ज्ञानाशिवाय तो काय करू शकेल? धर्माचे कायदे आड आले आणि अस्पृश्यांना विद्येपासून वंचित ठेवले म्हणून आपल्या धर्मातील समजूती अतिशय रसातळाला गेल्या अत्यंत मौल्यवान वस्तू म्हणजे विद्या, शिक्षणाशिवाय तुमच्या प्रगतीला दुसरा मार्ग नाही. त्याकरिता सर्वांनी आपले सर्वस्व शिक्षणाकरिता दिले पाहिजे. ज्ञान हे तलवारासारखे

आहे. समाजा एखाद्या माणसाच्या हाती तलवार आहे तिचा सदुपयोग की दुरूपयोग करावयाचा हे त्या माणासाच्या शीलावर अवलंबून आहे.  तो त्या तलवारीने खूनही करेल किंवा एखाद्याचा बचावही करील ज्ञानाचे असेच आहे शिकलेली माणसे नुसती पोटभरू असून चालणार नाही. ज्यांना स्वार्थापलीकडे काही दिसत नाही. त्यांना थोडाही परमार्थ करता येत नाही, ती माणसे नुसती शिक्षण घेऊन काय अर्थ ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षण हाच राष्ट्रीय उन्नतीचा मूलमंत्र आहे. “सामाजिक क्रांती घडवून आणावयाची असेल तर त्याची बीजे बालवयातच पेरली पाहिजेत.” असे त्यांना वाटत होते. क्रांती आणि परिवर्तन शिक्षणाशिवाय येऊच शकणार नाही हे क्रांतीचं गतिविज्ञान त्यांना अभ्यासान्ती कळलं होत. शिक्षण म्हणजे परिवर्तन हे त्यांच्या शैक्षणिक विचाराचं मुख्य सूत्र होतं.

व्यक्तीला जाणीव देते ते शिक्षण होय. अशी व्याख्या त्यांनी केली. शिक्षणाअभावी माणूस म्हणजे निव्वळ पशू असे त्याचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात “उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस बलहीन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो” डॉ. आंबेडकर म्हणतात, “आपली लेखणी आपल्या प्रश्नांपुरती बंदिस्त करू नका, तिचं तेज खेड्यापाड्यातील गडद अंधःकार दूर होईल असं परिवर्तित करा.” डॉ. बाबासाहेब आंबेडकर समुदाय शिक्षणाचे महत्त्व जाणणारे शिक्षणतज्ज्ञ होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जीवयदायी, शास्त्रीय मानववादी, समाजहितकारी शील आणि प्रज्ञा यांचा सुवर्णसंगम साधणारे शिक्षण अभिप्रेत होते. आम्ही एकवेळ आर्थिक लाभ सोडू पण उच्च शिक्षणाची दारे उघडून आमचा विकास करण्याची संधी आम्हाला मिळाली पाहिजे. या हक्काची मागणी आम्ही कधीच सोडणार नाही.

प्राचीनकाळात बहुजन जनतेची शिक्षणाची दारे बंद करण्यात आली होती. ब्राम्हणांनी आपली शिक्षणाची मक्तेदारी प्रस्थापित केली होती. शुद्र असल्यामुळे वेद म्हटल्या बद्दल रामाने शंभुकाला मृत्युदंड दिला महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वडिलांची त्यांनी जोतिबाला शाळेतून काढल्याबद्दल व त्यांना शेतीच्या पारंपारिक धंदयात घालण्याबद्दल एका ब्राम्हणाने मन वळविले होते. जोतिबानी खंडित झालेले शिक्षण एका मुसलमानाने दिलेल्या उपदेशाप्रमाणे पुन्हा सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मुंबईतील एल्फिस्टन महाविद्यालयामध्ये आपल्या बी.ए अभ्यासक्रमासाठी संस्कृत विषय घेऊ देण्यात आला नव्हता.

ही वस्तूस्थिती आहे की निरक्षतेने जनतेला मानसिकदृष्ट्याा गुलाम, नैतिकदृष्ट्याा, अधःपतित, सांस्कृतिकदृष्ट्याा पंगूत्व आर्थिकदृष्ट्याा दारिद्री आणि सामाजिकदृष्ट्याा मागासलेले केले होते. त्यांच्या सामाजिक दर्जामुळे त्यांचे जगणे दुःखमय करण्यात आले होते आणि ते कोणत्याही प्रतिष्ठेला आणि सन्मानाला मुकलेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक हत्यार म्हणून शिक्षणाचा पाठपुरावा केला.

निरक्षर जनतेला त्यांच्या गाढ झोपेतून जागे करण्याचे अवघड कार्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना करावयाचे होते आणि ब्राम्हणांनी त्यांच्यावर कशी अमानुषता लादली होती याची जाणीव करून द्यावयाची होती. त्यांनी तुतारी फुंकून त्यांना हाक दिली ‘शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा’  समाजाच्या उच्च स्तरावर आपली प्रगती आणि एकात्मीकरण व्हावे म्हणून आणि मानवी प्राणी म्हणून आपली योग्यता आणि आपली शक्ती वंचित जनतेने पुन्हा प्राप्त करावी म्हणून त्यांनी आत्मसहाय्य, आत्मअवलंबन,  आणि आत्मसन्मान याची चळवळ सुरू केली.

एकदा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना सांगितले, “तुमची गुलामगिरी तुम्ही स्वतः नष्ट केली पाहिजे. स्वतःचा आत्मसन्मान हरवून जगणे हे लांछानास्पद आहे. आत्मसन्मान ही जीवनातील अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे.  तिच्याशिवाय मनुष्य केवळ शून्यवत होतो. आम्ही गुलाम नाही, आम्ही लढवयाच्या कुळातील आहोत.

शिक्षणाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेबाचे तत्त्वज्ञान म्हणजे मनुष्याचे डोके, हृदय आणि हात यांच्या अंतर्गत गुणवताना जोपासणारी प्रक्रिया म्हणून शिक्षण संकल्पित करते. ते मानसाच्या अंगभूत मुरलेल्या शक्ती मुक्त करते आणि पशुतुल्य आस्तित्वाच्या पातळीवरून ते त्याग, विशुद्धता, सद्गुण आणि सात्विकता यांच्या पातळीपर्यंत उन्नत करते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षण हे आत्यंतिक ऐहिक हिताचे वाटत होते आणि त्याच्याशिवाय जीवनामध्ये दुसरे कोणतेही हित प्राप्त करून घेणे शक्य नव्हते. ते म्हणाले होते की, “सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा एक राजमार्ग आहे.” शिक्षणाचा हेतू

लोकांचे नैतिकीकरण आणि सामाजिकिकरण करणे हा होता. 'सभ्यता आणि संस्कृती याचा शिक्षण हा एक पाया होता' असे त्यांनी जाहिर केले. त्यांचा आग्रह होता की, 'जातीप्रथेच्या तटवंद्यावर उघड उघड हल्ला करण्यासाठी अस्पृश्यांनी शिक्षण घेतलेच पाहिजे. डूकरासारखे आपले पोट भरण्यासाठी जगू नका परंतु सांस्कृतिक विकासाठी मानवी प्राणी म्हणून जगा' असा उपदेश त्यांनी केला.

शिक्षणातील आपल्या लोकांच्या मागासलेपणाची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. त्यांची प्रगती घडवून आणण्यासाठी शिक्षणाची अत्यंत गरज आहे आणि ते अत्यंत मोठे हत्यार आहे असे त्याना वाटत होते. आपल्या लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी शक्य त्या प्रत्येक साधनाचा उपयोग करण्याचा प्रयत्न केला.

१९२८ मध्ये आपल्या जमातीचे शालेय शिक्षण भक्कम पायावर संघटीत करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित वर्ग शिक्षण संस्थेची (Depressed Classes Education Society) स्थापना केली. दलित वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या कल्याणाासाठी जे माध्यमिक शालेय शिक्षणाचा भार सहन करावयाला असमर्थ होते त्यांना वस्तीगृहे पुरविण्याचा कार्यात दलित वर्ग शिक्षण संस्थेला साहाय्य करण्याचे आवाहन त्यांनी शासनाला केले.
अस्पृश्यांच्या शिक्षणाचा प्रश्न आणखी एका बाजूने अवघड झाला होता. प्रवेश देण्याबाबत शासकीय निर्देश असूनही दलित वर्गाच्या मुलांना शाळांमध्ये प्रवेश नाकारले जात होते. शाळातील त्यांच्या प्रवेशाबाबतच्या प्रश्नावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भांडावे लागले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मुंबई विद्यापीठ हे प्रशासकांचे नव्हे तर विद्याव्यासंगी माणसाचे महामंडळ व्हावे अशी इच्छा होती. जिथे ज्ञान संपादन आणि ज्ञानाचा प्रसार हे अग्रगण्य कार्य घडून यावे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, शिक्षणाचे नियंत्रण निःसंशयपणे सुशिक्षित वर्गाने केले पाहिजे. परंतु दुर्देवाने सुशिक्षित वर्गाकडे सामाजिक सद्गुण नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. त्यांनी उद्घोषित केले की, सुशिक्षित वर्ग केवळ जनतेची उपेक्षा करतात. त्यांनी सूचविले की, विद्यापीठाचा मूलभूत हेतू होता जनतेच्या दारातील पायऱ्यापर्यंत शिक्षण घेऊन जाणे, विद्यापीठाचे मूल्यांकन केवळ त्यांच्या ज्ञान-संपादनाने न होता त्यांच्या सामाजिक वागणूकीने झाले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती.

निम्न मध्यम वर्गामध्ये आणि विशेषतः अनुसूचित जातीमध्ये उच्च शिक्षणाचे प्रसारण करण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी ८ जुलै १९४५ रोजी पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि २० जून १९४६ रोजी सिद्धार्थ कला आणि विज्ञान महाविद्यालय सुरू केले आणि भारतातील एक अग्रगण्य महाविद्यालय असल्याचे सिद्ध केले. पिपल्य एज्यूकेशन सोसायटीची ध्येय व उद्दिष्टे जाहीर करतांना ते म्हणाले की, या संस्थेचा हेतू केवळ शिक्षण देण्याचाच नव्हता परंतु शिक्षण अशारितीने द्यावयाचे होते की, त्यामुळे भारतामध्ये बौद्धिक सामाजिक आणि नैतिक लोकशाहीचे प्रसारण करता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनकाळात १९५० मध्ये औरंगाबाद येथे मिलिंद कला व विज्ञान महाविद्यालय स्थापन केले. १९५३ मध्ये सिद्धार्थ वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय आणि सिद्धार्थ विधी महाविद्यालय मुंबई येथे स्थापन केले. ही महाविद्यालये बहुजनांच्या मुलामुलींना उच्च शिक्षण देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने मार्गक्रमण करीत आहेत.

दलित वर्गांचा उत्कर्ष व अस्पृश्यता निमूर्लन केवळ सवर्णांची सद्भावना व सदिच्छावर निर्भर नाही तर दलित वर्गाचा वास्तविक उत्कर्ष तेव्हाच शक्य आहे. जेव्हा दलित वर्ग स्वयं जागरूक होतील आणि त्याकरिता दलितांनी शिक्षीत, संघर्षरत आणि संघटीत बनण्याची आवश्यकता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादीत केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मतानुसार दलित वर्ग आणि अस्पृश्यांना शिक्षीत, संघटीत आणि संघर्ष करण्याकरीता प्रेरित करण्याचे कार्य यावर्गातील समर्थ व सुशिक्षित नेतृत्त्वच करू शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित वर्गाचा उत्कर्ष आणि अस्पृश्यता निवारण करण्याला आपल्या जीवनात सर्वाधिक महत्त्वपूर्ण मानले होते. या अभियानात दलित वर्गाचे नेतृत्त्व करण्याचा विडा उचलला.

दलित वर्गाच्या स्थितीत सुधार होण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्यात शिक्षणाचा व्यापक प्रसार-प्रचारला आवश्यक माणत होते. परंतु त्यांचे असे देखील मत होते की भारतीय समाजव्यवस्थेत शिक्षणाचे जे स्वरूप प्रचलित आहे ते व्यक्तीला जाती व वर्णाच्या आधारापासून मुक्त करू शकत नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणप्रणालीत अमूलाग्र परिवर्तन झाले पाहिजे या मताचे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अशी अपेक्षा होती की, सरकारद्वारा दलित वर्गात शिक्षणाचा प्रसार-प्रचार करण्याकरीता पर्याप्त

साधन-सुविधा उपलबध केल्या गेल्या पाहिजेत. दलित वर्गाला शिक्षणाचा समुचित अवसर प्रदान करण्याकरिता शाळा, महाविद्यालयात या वर्गातील विद्यार्थ्यांकरिता ठराविक आरक्षणाची मागणी केली. दलित वर्गांच्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची इच्छा उत्पन्न करण्याकरिता व शिक्षणानंतर परंपरागत व्यवसायापासून वेगळे होऊन उपयुक्त व्यवसायात स्थान प्राप्त करण्याकरीता राजकीय सेवेत या वर्गासाठी पदाच्या आरक्षणाची मागणी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते की, दलित वर्गात शिक्षणासाठी जागरूकता निर्माण करणे एवढेच पर्याप्त नाही. केवळ शाळा, महाविद्यालयात दलित वर्गाला आरक्षण देऊन त्यांची प्रगती निश्चित करता येणार नाही. त्यांचे मत होते की, या वर्गाची शैक्षणिक उन्नती आणि त्यांना उपयुक्त व सन्मानजनक व्यवसायात लागणे तेव्हा शक्य होईल जेव्हा सरकारकडून इतर वर्गांच्या समकक्ष दलित वर्गाला शिक्षणाच्या सोयी-सुविधा प्राप्त होतील.

### *शिक्षणामुळे झालेले बदल :*

अनुसूचित जातीमध्ये शिक्षणामुळे क्रांतीकारक बदल झाले ही वास्तविकता आहे. ज्या शेकडो वर्षापासून जातीय-धार्मिक व्यवस्थेचे निर्बंध, अस्पृश्यतेमध्ये अडकलेल्या या जनतेला 'माणूस' पणाची जाणीव झाली, शिक्षणामुळे विचार, वर्तन व व्यवहारात बदल झाला. सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रात बदल घडून आला. त्यांच्या आर्थिक स्थितीत बदल झाला शिक्षणाभिमुख रोजगार, नोकरी करून या वर्गात बराच बदल झाला. या वर्गातील लोक आपल्या बांधवाकडे पाहून त्याचे अनुकरण करीत शिक्षणाला प्राथमिकता देत आहेत. अनुसूचित जाती विशेषतः बौद्धांमध्ये अमूलाग्र क्रांती घडून आली. वर्तमान स्थितीत राजकारण व प्रशासनातील सर्वच क्षेत्रात ते आपली यशस्वी सेवा देतांना आढळतात. तसेच जून्या प्रथा परंपरा चालीरितीचा त्याग करून नव्या विचारांचा स्वीकार करण्यात येत आहे. ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रात त्यांची स्थलांतरणाची गती अधिक आहे.

### *सारांश :*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला, कार्याला आदर्श माणूस अनुसूचित जातीमध्ये आमुलाग्र परिवर्तन झाले आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा, परंपरा, जातीय- धार्मिक निर्बंध नष्ट करून दलित वर्गाच्या विकासाकरिता शिक्षण आवश्यक आहे. आपण उपाशी अर्धउपाशी राऊन वाटेल तो त्याग करावा लागला तरी करू परंतु मुला-मुलींना शिक्षण देऊ, शिक्षणच विकासाचा मार्ग आहे. शिक्षणामुळे रोजगार, नोकरी व इतर व्यवसायात प्रवेश झाला. ज्ञानाची वाढ, संस्कारक्षम जीवन पद्धतीचा अवलंब करता येईल. वर्तमान परिस्थितीत दलित वर्गातील लोकांचे शिक्षणाचे प्रमाण वाढले असले तरी एकूण लोकसंख्येच्या तुलनेत निरक्षतेचे प्रमाण आजही बरेच आहे. काहीना रोजगार व नोकरी मिळाली म्हणजे सर्वांचा विकास झाला असे होत नाही. त्यामुळे त्यांची गरिबी, हालाकीची परिस्थिती लक्षात घेता शासनाला कृती आराखडा तयार करावा ज्यामुळे अनुसूचित जातीचा सर्वांगिण विकास होऊन मुख्य प्रवाहात येण्यास मदत होईल.

### *संदर्भ :-*


१. कसबे रावसाहेब, शिक्षणाची आव्हाने, सुगावा प्रकाशन,पुणे २००२

२. राऊत किशोर, धमक्रांती आणि विदर्भातील शिक्षण जगन करो (संपादक) धम्मक्रांतीची फलपृती तक्षशिला प्रकाशन पुणे, २००६

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९५५ मुंबई येथील ऐतिहासिक भाषणे ३ एप्रिल १९५५ सिद्धार्थ महाविद्यालय.

४. किर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २००६

५. पवार दया, (संपादक) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (गौरव ग्रंथ)

६. प्रा. निंबाळकर वामन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा प्रबोधन प्रकाशन, ऑक्टोंबर २००६

७. जाधव विजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मनोरमा प्रकाशन, मुंबई २००७.

८. कामत मंगला, महाराष्ट्रातील समाजसुधारक, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, प्रकाशन, पुणे २००६.

९. प्रा. डॉ. भैलुमे राजाभाऊ वि., भिवा ते बोधिसत्व, प्रतिमा प्रकाशन, पुणे २००६.

१०. देशपांडे भ.द., डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार, लोकवाड्.मय गृह प्रकाशन, मुंबई

११. मेणसे कृष्णा, डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी, लोक वाड्.मय गृह प्रकाशन, मुंबई

१२. किर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन
१३. कसबे रावसाहेब , डॉ. आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन, १९८५
१४. कांबळे सरोज, मनुस्मृती, स्त्रिया आणि डॉ. आंबेडकर, सावित्रीबाई ड्गुले प्रकाशन, १९९९.
१५. मोरे, शेषराव, डॉ. आंबेडकरांचे सामाजिक धोरण : एक अभ्यास, राजहंस प्रकाशन, पुणे १९९८.